आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
सोमवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०२४

ठळक बातम्या

1. एक लाखाहून अधिक नवनियुक्त कर्मचाऱ्यांना प्रधानमंत्री रोजगार मेळयात नियुक्तीपत्राचं वाटप; नागपूरात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते 119 जणांना नियुक्त पत्र वितरण.

2. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ सदस्य अशोक चव्हाण यांचा पक्षसदस्यत्वाचा राजीनामा; दोन दिवसात पुढील राजकीय भूमिका जाहीर करणार.

3. राज्यातल्या शासकीय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी आशियाई विकास बँकेनं 4 हजार कोटी रुपये केले मंजूर.

4. 4जी सॅच्युरेशन प्रोजेक्ट मिशन 500 च्या माध्यमातून मोबाईल नेटवर्क नसणाऱ्या देशातील 31 हजार गाव-खेड्यांना 4जी सेवा देणार- BSNL महाराष्ट्र आणि गोवा परिमंडळाचे मुख्य महाव्यवस्थापक रोहित शर्मा यांची नागपूरमध्ये माहिती.

*****

एक लाखाहून अधिक नियुक्तीपत्राचं वाटप

तरुणांना आपली क्षमता दाखवण्याची समान संधी मिळावी यासाठी सरकार निश्चित कालावधीत भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज रोजगार मेळाव्याअंतर्गत केंद्र सरकारच्या विविध आस्थापनांमध्ये नव्यानं भरती झालेल्या एक लाखाहून अधिक उमेदवारांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून नियुक्तीपत्रांचं वाटप केलं तेव्हां ते बोलत होते. सरकारने भरती प्रक्रिया पारदर्शक केली असल्याचं त्यांनी म्हटलं. २०१४ पासून सरकार तरुणांना देशाच्या विकास प्रक्रियेत सहभागी करून घ्यायचा प्रयत्न करत असल्याचं त्यांनी नमूद केलं. सरकारच्या प्रयत्नांमुळे देशात तरुणांसाठी नवीन क्षेत्र निर्माण होत असून यात सरकारच्या नवीन अभियानांमुळे रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी तयार होत असल्याचं त्यांनी सांगितलं. भारतात आता तिसरी मोठी स्टार्टअप इकोसिस्टम असून देशात जवळपास सव्वा लाख स्टार्टअप असल्याचं मोदी यांनी म्हटलं. स्टार्टअप, तरुणांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण करत असल्याचं त्यांनी नमूद केलं. या दशकाच्या अखेरपर्यंत भारतीय रेल्वेचा संपूर्ण कायापालट होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. चांगल्या कनेक्टिव्हिटीमुळे अर्थव्यवस्थेत सर्वांगीण प्रगती होत असल्याचं सांगून ते म्हणाले की यामुळे नवीन व्यवसाय आणि पर्यटन वाढ होण्यासाठी मदत मिळत आहे. विकसित भारताच्या प्रवासाला आज भरती झालेल्या एक लाख नवीन उमेदवारांमुळे नवी ऊर्जा मिळेल आणि त्यांचे प्रयत्न राष्ट्रनिर्मितीसाठी समर्पित असतील, असं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या

कार्मिक विभागाच्या नव्या वास्तूची कर्मयोगी भवनच्या पहिल्या टप्प्याची पायाभरणी यावेळी पंतप्रधानानी केली. देशभरात ४७ ठिकाणी हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपूर जिल्ह्याच्या हिंगणा इथल्या केंद्रीय राखीव पोलीस बल ग्रुप सेंटर मध्ये एकूण ११९ नवनियुक्तांना नियुक्तीपत्रांचं वितरण करण्यातं आलं. प्रधानमंत्री रोजगार मेळाव्यात गोरगरीब, कष्टकरी, सामान्य जनता या समाज घटकांना सेवा देण्याचं काम शासकीय कर्मचाऱ्यांवर असते, ही सेवा नवनियुक्तांकडून घडावी, अशी अपेक्षा गडकरी यांनी आज व्यक्त केली.

<u>अशोक चव्हाण राजीनामा</u>

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांनी आज पक्ष सदस्यत्वाचा तसंच आमदारकीचा राजीनामा दिला आहे.पक्षाचा राजीनामा देत असल्याचं पत्र त्यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना पाठवले असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे आमदारकीच्या राजीनाम्याचं पत्र साडे अकराच्या सुमाराला सादर केलं आहे. अध्यक्ष नर्वेकर यांनी चव्हाण यांचा राजीनामा स्वीकारला, असल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे. प्रसार माध्यमांशी बोलताना अशोक चव्हाण यांनी आपण काँग्रेसच्या सर्व पदाचा राजीनामा दिला असून पक्षांतर्गत प्रकरणं चव्हाट्यावर आणणाऱ्या पैकी मी नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. सध्या कुठल्याही राजकीय पक्षासोबत जाण्याबाबत मी निर्णय घेतला नाही. येणाऱ्या दोन दिवसात आपण आपली पुढची राजकीय भूमिका जाहीर करू असेही त्यांनी स्पष्ट केलं. काँग्रेस पक्षाने अनेक नेत्यांना खूप काही काही दिले आहे. आज काँग्रेस पक्ष संविधान आणि लोकशाही वाचविण्याची लढाई लढत असताना सर्वकाही मिळालेले नेते काँग्रेस पक्षाला आणि विचारधारेला सोडून जात आहेत हे दुर्देवी आहे. कोण, कशासाठी, कुठे जात आहे? हे जनता उघड्या डोळ्याने पहात आहे. भारतीय जनता पक्षाविरोधात पूर्ण ताकदीनिशी लढून त्यांना पराभूत करू. अशी प्रतिक्रिया काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी समाजमाध्यमावर व्यक्त केली आहे. दरम्यान, सर्वच पक्षांचे चांगले आणि बडे नेते आमच्या संपर्कात असून आगे आगे दोखो होता है क्या...असे सूचक वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत केले. फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील काँग्रेसच्या दोन नगरसेवकांनी भाजपामध्ये प्रवेश केला त्यावेळी ते बोलत होते.

रामदास आठवले

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार जे.पी.नड्डा यांची भेट घेतली. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रा च्या राजकीय घडामोडींवर यावेळी उभय नेत्यांमध्ये चर्चा झाली. महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाला लोकसभेच्या किमान दोन जागा देणे आवश्यक आहे. शिर्डी हा राखीव मतदारसंघ रिपब्लिकन पक्षाला मिळाला पाहिजे ही रिपब्लिकन कार्यकर्त्यांची आग्रहाची मागणी असल्याबाबत या भेटीत रामदास आठवले यांनी जे पी नड्डा यांना माहिती दिली.

रुग्णालय निधी

राज्यातल्या शासकीय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी आशियाई विकास बँकेनं ४ हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यात १ हजार २०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येत आहेत. राज्यातल्या आकांक्षित जिल्ह्यांमध्ये अद्ययावत आणि दर्जेदार जिल्हा रुग्णालयं उभारण्यासाठी हा निधी खर्च करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. सुरुवातीला धाराशिव जिल्ह्यात सर्वसुविधायुक्त ५०० खाटांचं अद्यावत जिल्हा रुग्णालय उभारण्याची तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

हवामान-अवकाळी पाऊस

नागपूर ग्रामीणमधील काही गावांमध्ये काल रविवारी अवकाळी पावसासोबतच गारपीट झाल्याने पिकांना फटका बसला. पालकमंत्री आणि  उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना मदतीचे आश्वासन दिले आहे. शनिवारपासून विदर्भात अवकाळी पाऊस आणि गारपीट सुरू आहे. ग्रामीणमधील पांजरी लोधीमध्ये गारा पडल्या. दरम्यान हवामान खात्याने आजही नागपूर,भंडारा आणि गोंदियासह विदर्भातील अन्य काही जिल्ह्यांत हलका पाऊस पडण्याची तर गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा आणि विदर्भात अन्यत्र हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तवली आहे. गोंदिया जिल्ह्यात काल वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. या पावसाचा सर्वाधिक फटका अर्जुनी मोरगाव तालुक्याला बसला असून, भुरशीटोला परिसरात मका पिकाचं मोठं नुकसान झालं आहे.

<u>बीएसएनएल</u>

आत्मनिर्भर भारत अभियाना अंतर्गत 4 जी सॅच्युरेशन प्रोजेक्ट मिशन 500 च्या माध्यमातून मोबाईल नेटवर्क नसणाऱ्या देशातल 31 हजार गाव -खेड्यांना 4 जी सेवा देण्याचे काम BSNL वर सोपविले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डिजिटल इंडिया मिशन अंतर्गत जलद इंटरनेट सेवा पुरवून केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा जनतेला लाभ मिळावा यासाठी BSNL प्रयत्नशील राहणार असल्याची माहिती BSNL महाराष्ट्र आणि गोवा परिमंडळाचे मुख्य महाव्यवस्थापक रोहित शर्मा यांनी आज नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत दिली. केंद्रीय दूरसंचार मंत्रालयाच्या अधीन सार्वजनिक उपक्रम असलेल्या भारत संचार निगम लिमिटेड-बीएसएनएलच्या नागपूर कार्यालयाद्वारे आजपासून ते 15 फेब्रुवारी दरम्यान 20व्या अखिल भारतीय बीएसएनएल कॅरम आणि कल्चरल टूर्नामेंटचे आयोजन करण्यात आले असून याचे उद्घाटन रोहित शर्मा यांच्या हस्ते आज झाल्यानंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते. महाराष्ट्रातील 5200 नेटवर्क नसलेली खेडी ही 2751 नवीन टॉवर उभारून 4जी मोबाईल नेटवर्क युक्त बनविणार असल्याचे शर्मा यांनी सांगितले. सी डॉट, टिसीएस, तेजस या संस्थाच्या साहाय्याने स्वदेशी 4जी तंत्रज्ञान विकसित केले असून स्वतःचे मोबाईल नेटवर्क तंत्रज्ञान असणारा भारत हा जगातील 5 वा देश ठरला आहे. स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित ही 4जी सेवा ही 5जी पर्यंत सुद्धा विकसित करता येत असल्याचे त्यांनी सांगितले. येणाऱ्या काळात BSNL चे सर्व टॉवर हे 4जी मधे रुपांतरीत करणार असून महाराष्ट्रात याची सुरुवात झाली आहे.भारतनेट फेज 2 मार्फत देशातील ग्राम पंचायत आणि ग्रामीण संस्था यांना BSNL मार्फत निरंतर इंटरनेट आणि मोबाईल नेटवर्क पुरवून यांना अजून मजबूत करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

*****